दस्तावेज क्र. ७०

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra

Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्र. मजनिप्रा/२०१९/स्वाधिकारे/वाशिम/२००९ चे प्रकरण क्र. ४/४६४

दि. ०९/०९/२०२०

**विषय :– वर्ष २०१८–१९ रबी हंगामाकरिता मोटसावंगा लघू सिंचन प्रकल्प, मोटसावंगा, तहसिल मंगळूरपीर, जिल्हा वाशिमच्या कालव्या मधून पाणी सोडण्याकरीता याचिकाकर्ता गोविंद बाबा पाणी वापरकर्ता संघटना, निंबी, तह. मंगळूपीर, जि. वाशीम यांचे कडून त्याचे अध्यक्ष गोविंदबाबा पाणी वापरकर्ता संघटना, निंबी, तहसिल मंगळूरपीर, जि. वाशिम प्राधान्यक्रमाने विचारार्थ मांडलेल्या सूचनेवर स्वाधिकारे कार्यवाही करण्याच्या प्रकरणात.....प्रकरण क्र. ४/२०१९**

उपरोक्त प्रकरणातील आदेश क्र. ०६/२०२० दि. ०९/०९/२०२० ची प्रत जोडलेली आहे.

(प्राधिकारणाच्या आदेशान्वये)

सहपत्रे : वरील प्रमाणे

स्वा/–

(डॉ. रामनाथ सोनावणे)

सचिव

प्रत माहिती कार्यवाहीकरिता :

१. अध्यक्ष गोविंदबाबा पाणी वापरकर्ता संघटना, निंबी, तह. मंगळूरपीर, जिल्हा वाशीम (याचिकाकर्ता)

२. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपत्ती विभाग, सिंचन भवन, शिवाजी नगर, अमरावती–४४४६०२ (प्रतिवादी क्र. १)

३. अधिक्षक अभियंता, वाशीम सिंचन मंडळ, सिव्हील लाइन रोड, वाशीम–४४४६०२ (प्रतिवादी क्र. २)

४. कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग (बांधकाम) सिव्हील लाईन रोड, वाशिम–४४४६०२ (प्रतिवादी क्र. ३)

-

सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ७०

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

---

**आदेश क्र. ०६/२०२०**

**(आदेश क्र. ०६/२०१९ मुळे उद्भवलेल्या अनुपालन कार्यवाहीत निर्गमीत करण्यात आले)**

**वर्ष २०१८—१९ रबी हंगामाकरिता मोटसावंगा लघू सिंचन प्रकल्प, मोटसावंगा, तहसिल मंगळूरपीर, जिल्हा वाशिमच्या कालव्या मधून पाणी सोडण्याकरीता याचिकाकर्ता गोविंद बाबा पाणी वापरकर्ता संघटना, निंबी, तह. मंगळूपीर, जि. वाशीम यांचे कडून त्याचे अध्यक्ष गोविंदबाबा पाणी वापरकर्ता संघटना, निंबी, तहसिल मंगळूरपीर, जि. वाशिम यांचे मार्फत प्राधान्याने विचारार्थ मांडलेल्या सूचनेवर या प्राधिकरणा द्वारे स्वाधिकारे दखल घेण्याचे प्रकरणाविषयी २०१९ चे प्रकरण क्र. ४**

अध्यक्ष

गोविंदबाबा पाणी वापरकर्ता संघटना,

तह. मंगळूरपीर, जि. वाशीम

.......याचिकाकर्ता/माहिती देणारा

विरूद्ध

१. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपत्ती विभाग, सिंचन भवन, शिवाजी नगर, अमरावती – ४४४ ६०२

२. अधिक्षक अभियंता, वाशीम, सिंचन विभाग (बांधकाम), सिव्हील लाईन, वाशीम–४४४५०५

३. अधिक्षक अभियंता, वाशीम, सिंचन विभाग (बांधकाम), सिव्हील लाईन, वाशीम–४४४५०५

......प्रतिवादी

**कोरम : डॉ. एस.टी. सांगळे, सदस्य (अर्थशास्त्र),**

**श्री. व्ही. जे. तिवारी, सदस्य (कायदा),**

**दि. ०९ सप्टेंबर २०२०**

**पार्श्वभूमि**

१) अध्यक्ष, गोविंदबाबा, पाणी वापरतकर्ता संघटना निंबी, तहसिल मंगळूरपीर जिल्हा वाशिम, यांनी त्यांचे दि. ०२/०९/२०१९ च्या अर्जाद्वारे या प्राधिकरणाशी संपर्क साधून वर्ष २०१८–१९ च्या रबी हंगामाकरीता लघु सिंचन प्रकल्प, मोटसावंगा, तहसिल मंगळूरपीर, जिल्हा वाशीमच्या कालव्यातून पाणी सोडण्याकरिता प्रतिवादींना योग्य ते निर्देश देण्याचे व या हंगामात कालव्यामध्ये पाणी न सोडल्यामुळे झालेल्या नुकसाना करीता भरपाई देण्यास विनंती केलेली आहे.

२) मुद्दा विचारात घेउन याचिकाकर्ताच्या सदर अर्जावर दखल घेउन व मजनिप्रा च्या कामकाग करणे – विनियमन २०१३ (थोडक्यात ''नियमन'') च्या नियम ११ (१) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून हया प्राधिकरणाने शेतकऱ्यांच्या मुख्यत: गोविंदबाबा पाणी वापरकर्ता संघटना (थोडक्यात ''याचिकाकर्ता) चे सदस्य किंवा लाभार्थींच्या हितास्तव या प्राधिकरणाने स्वाधिकारे कार्यवाही सुरू करण्याचा निर्णय घेतला.

३) सदर अर्जावर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी नियमनाच्या नियम ११ (४) मधील तरतूदी अंतर्गत अधिकाराचा वापर करून या प्राधिकरणाने सर्व संबंधितांना त्यांचे उत्तर दाखल करण्याकरिता नोटीसी बजावल्या व प्रकरण सुनावणीसाठी ठेवले.

४) प्राधिकरणाने दोन सुनावण्या घेतल्या व प्रकरण दि. ६ मे २०१९ रोजी अंतिम निकालासाठी ठेवले. निर्देशित केल्याप्रमाणे अनुपालन सुनावणी दि. ११ फेब्रुवारी २०२० रोजी नियोजित करण्यात आली. दिलेल्या निर्देशांचा परिच्छेद निहाय अनुपालन अहवाल प्राधिकरणाने घेतला.

५) अधिक्षक अभियंता, वाशीम सिंचन मंडळ, वाशीम, प्रतिवादी क्र. ३ यांनी दि. ०७/०२/२०२० च्या प्रत्युत्तरादाखल सविस्तर अनुपालन अहवाल सादर केला.

६) दिनांक ११ फेब्रुवारी २०२० च्या कार्यवाहीचा मतितार्थ

| अनु.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | अरविंद गेडाम | अधिक्षक अभियंता, वाशीम सिंचन मंडळ, वाशीम |
| २. | प्रशांत व्ही. बोरसे | कार्यकारी अभियंता, वाशीम सिंचन विभाग, वाशीम (बांधकाम) |

अ. प्राधिकरणाचे आदेश दि. ११ जुन २०१९ प्रमाणे अधिक्षक अभियंता, वाशीम सिंचन मंडळ, वाशीम (प्रतिवादी क्र.२) यांना त्यांचे हाताखाली काम करणारे कार्यकारी अभियंता, वाशीम सिंचन विभाग, वाशीम (बांधकाम) (प्रतिवादी क्र. ३) व कालवा अधिकारी यांची क्षमता वाढविण्याकरीता, त्वरीत पाउले उचलण्या करीता निर्देश देण्यात आले होते. प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांचे अनुपालन केले किंवा नाही हा प्रश्न प्राधिकरणाने प्रतिवादी क्र.२ ला उपस्थित केला. प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले की पाणी वापर संस्थाच्या सदस्यांना डब्ल्यु ए एल एम आय (वाल्मी) औरंगाबाद येथे प्रशिक्षणाकरीता पाठविण्याचे प्रस्तावित केलेले आहे. प्रतिवादी क्र. ३ ने दिलेल्या उत्तराने प्राधिकरणाचे समाधान झाले नाही.

ब. प्रतिवादी क्र. २ ला दिलेल्या निर्देशांचे अनुपालन का झालेले नाही या बाबत प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. ३ ला प्रश्न केला. प्रतिवादी क्र.३ ने सांगितले की, त्याने प्रतिवादी क्र. २ चा कार्यभार घेतला आहे. आदेशामध्ये दिलेल्या सर्व निर्देशांचे अनुपालन करण्याची प्रतिवादी क्र.३ ची जबाबदारी आहे.

क. प्राधिकरणाने आदेशामध्ये दिलेल्या निर्देशांचे प्रमाणे केलेल्या कार्यवाही संबधी प्रतिवादी क्र. ३ ला प्रश्न केला. प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले की,

i. वर्ष २०१९–२०२० करीता पा.वा.सं. (डब्ल्यु यू ए) करीता एकूण उपलब्ध कोटा ३.४३ एम सीयु एम असुन पा.वा.सं. ला त्या प्रमाणे कळविण्यात आले होते. पा.वा.सं. च्या विनंती प्रमाणे वर्ष २०१९–२०२० करीता रबी हंगामा करीता एकूण ५ आवर्तनाची योजना आहे. आजपर्यंत फक्त २ आवर्तने पूर्ण झाली आहेत. एकूण ११ कि.मी. लांबीच्या कालव्याच्या ३.५ किमि पर्यंत पाणी पोहेचलेले आहे. प्रतिवादी क्र. ३ ने मान्य केले की, पा.वा.सं.ना कालवा दुरूस्ती करीता नोटीस दिल्या होत्या परंतु ते अनुपालन करण्यास असमर्थ ठरले. प्रतिवादी क्र. ३ च्या उत्तरावर प्राधिकरणाने नाराजी व्यक्त केली.

ii. पा.बा.सं. यांचे कडून पाण्याचा अनाधिकृत वापर झालेला नाही. मागील वर्षाचा अनुभव विचारात घेता, जलाशयाच्या अपस्ट्रीम मधून पाण्याचा अधिक उपसावर नियंत्रण ठेवण्याकरिता पुष्कळशी बंधने घालण्यात आली आहेत. जलाशयाच्या लाभार्थ्यांकडून विरोध झालेला नाही. सिंचनाचे वेळापत्रक अंमलात आणतांना कोणतीही अडचण आली नाही.

iii. प्राधिकरणाने प्रतिवादी क्र.३ ला प्रश्न केला की त्यांना महाराष्ट्र सिंचन पद्धतीने शेतकऱ्यांडुन व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम ६० ची तरतुद माहिती आहे किंवा नाही, प्रतिवादी क्र. ३ ने नकारार्थी उत्तर दिले.

iv. प्राधिकरणाने प्रतिवादी क्र.३ ला प्रश्न केला की त्यांनी महाराष्ट्र सिंचन पद्धतीने शेतकऱ्यांडुन व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ५३ (i) अंतर्गत अनविार्य असल्याप्रमाणे पा.वा.सं.

ला आवश्यक तांत्रिक व व्यवस्थापकीय मदत उपलब्ध करून दिली आहे किंवा नाही. प्रतिवादी क्र. ३ ने सकारात्मक उत्तर दिले.

v. प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. ३ ला प्रश्न केला की मुख्य कालव्याच्या शेवट पर्यंत पाणी पोहोचलेले किंवा नाही. प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले की एकूण ११ कि.मि. पैकी फक्त ३.५ कि.मि. पर्यंत पाणी पोहोचले आहे. प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले की कालवा कार्यान्वयन व देखभाली करीता पा.वा.सं. कडे हस्तांतरीत केला होता. प्राधिकरणाने असे मत दर्शविले की महाराष्ट्र सिंचन पद्धतीने शेतकऱ्यांडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ५३ मुख्य कालव्याच्या स्वच्छतेची जबाबदारी सुद्धा कालवा अधिकाऱ्याची आहे. प्राधिकरणाच्या निदर्शनास आले की कालव्याचे पाणी ११ कि.मी. पर्यंत पोहचण्याची आवश्यकता आहे. तथापि कालव्याचे पाणी फक्त ३.५ कि.मि. पर्यंत पोहचले आहे. ज्यामुळे प्रकल्पाच्या बी.सी. गुणोत्तरावर परिणाम होईल.

प्रतिवादी क्र. ३ ने आणखी सांगीतले की यांत्रिकी विभागाच्या उपयोजन कार्यक्रमा मार्फत कालवा स्वच्छता करण्याकरीता यंत्रांच्या उपलब्धतेसाठी विभाग प्रयत्न करीत आहे.

प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. ३ ला प्रश्न केला की जर पाण्याचा वापर झाला नाही व ३१ मे २०२० नंतर पाणी वाया गेले तर त्याकरीता कोण जबाबदार राहील? प्रतिवादी क्र.३ ने सांगितले की महाराष्ट्र पाणी क्षेत्र सुधारणा प्रकल्प (एम डब्ल्यु एस आय पी) अंतर्गत कालवा पा.वा.सं. यांना हस्तांतरित केलेला आहे; म्हणून कालव्याच्या देखभाल व दुरूस्ती करीता पा.वा.सं. जबाबदार राहील.

vi. प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. ३ ला पाण्याचे शुल्काचे वसूली बाबत प्रश्न केला व पाण्याचे शुल्क प्रदान न करण्याकरीता पा.वा.सं. यांचे विरूद्ध कोणती कारवाई घेतली याबाबत सुद्धा विचारण

केली प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले की ३.०० कि.मि. कालव्याची स्वच्छता केली असून याचिकाकर्ता ने पाण्याचे शुल्क दिलेले नाही. पा.वा.स. च्या विरूद्ध कोणतीही कडक कारवाही केलेली नाही. प्राधिकरणाने निदर्शनास आणून दिले की प्रतिवादी क्र. ३ ने पा.वा.सं. विरूद्ध पाण्याचे शुल्काचा भरणा न करण्याकरिता योग्य कारवाई करणे आवश्यक आहे. कारण ते शेतकऱ्यांच्या हितात, अंतिमत देखभाल व सिंचन क्षमतेच्या उपयोगाशी थेट संबंधित आहे.

vii. प्राधिकरणाने आणखी असेही निदर्शनास आणून दिले की, उपकराच्या वसूलीचे कार्य ही एक मुख्य जबाबदारी असून त्याकरीता कोणतेही कारण चालणार नाही.

७) या प्राधिकरणाने पत्र दिनांक २२/०७/२०२० अन्वये अधिक्षक अभियंता वाशीम सिंचन मंडळ वाशीम यांना उपरोक्त अनु. क्र. ३ मध्ये नमुद निरीक्षणे/दिशनिर्देशासंबंधी सविस्तर शपथपत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

८) कार्यकारी अभियंता, वाशीम सिंचन विभाग वाशीम (बांधकाम) यांनी दिनांक ११/०८/२०२० च्या पत्रासह, शपथपत्राच्या नमुन्यात, अनुपालन संलग्नित केला आहे.

९) प्रतिवादी क्र. ३ कडून पत्र दि. ११/०८/२०२० अन्वये सादर केलेले सादरीकरण विचारात घेउन प्राधिकरणाने याप्रकरणाची बारकाईने छाननी केली व त्याचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

### प्रतिवादींना या प्राधिकरणाने आधी दिलेल्या दिशानिर्देशांच्या अनुपालना संबंधी

अ. कार्यकारी अभियंता वाशीम सिंचन विभाग (प्रतिवादी क्र. ३) यांनी त्यांचे पत्र दिनांक १४/०२/२०२० अन्वये पाणी उपकराच्या थकबाकीची रक्कम रू. ७.८४ लक्ष जमा करण्याचे पा. वा.सं. यांना निर्देश दिले. पा.वा.सं. यांनी रू. ०.७४ लक्ष जमा केले. पा.वा.सं. यांच्याकडे रू.

७.१० लक्ष अजुनही थकीत आहेत. विभागाने त्यांचे पत्रे दि. ०२/०५/२०२० व १५/०५/२०२० अन्वये पा.वा.सं. यांना स्मरणपत्र दिलेले आहे. तथापि, थकबाकीच्या वसूलीची प्रगती उद्वेगजनक असून ठोस काळ मर्यादित पाउले उचलण्याची आवश्यकता आहे, जी कार्यवाही केलेली सध्या आढळत नाही.

ब. प्रतिवादी क्र. ३ ने दि. २९/०२/२०२० ला वाशीम येथे महाराष्ट्र सिंचन पद्धतीने शेतकऱ्यांडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र पाटबांधारे अधिनियम १९७६ वर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत प्राध्यापक (निवृत्त) वाल्मी, औरंगाबाद यांचे कडून मार्गदर्शन घेण्यात आले. कालवा अधिकारी व सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित सर्व कर्मचारी उपस्थित होते आणि ते सिंचन व्यवस्थापन कर्मचारी पा.वा.सं. चे सशक्तीकरणावर ज.सं.वि. कडून २१ मे ते २९ में २०२० पर्यंत आयोजित इ–कार्यशाळेला सुद्धा उपस्थित होते. (वेबीनार).

सी. प्रतिवादी क्र. ३ ने सांगितले की, त्यांचे कार्यालय पा.वा.सं.ना, पावसाळयाच्या शेवटी धरणामध्ये उपलब्ध साठवणीच्या आधारावर व त्यांना विहीत केलेल्या पाण्याचा हक्का प्रमाणे पाण्याच्या कोटयाचे वाटप करते.

डी. प्रतिवादी क्र. ३ ने पा.वा.सं. च्या सशक्तीकारणाकरीता दि. २६/०२/२०२० रोजी वाशीम येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. अंदाजे १५० सहभागी उपस्थित होते. (पा.वा.सं.चे सदस्य व सिंचन व्यवस्थापनाशी संबंधीत कर्मचारी)

ई. प्रतिवादी क्र. ३ व त्यांचे कर्मचारी, कालव्यांचे जाळे चांगल्या स्थितीत राखण्याची खात्री करणे व विभागाकडून विहीत पाणी वापर हक्कांशी (पी यु डब्ल्यु ई) सुसंगत ठेवण्याकरीता पा.वा.सं. ना सूचना देत आहेत. मागील हंगामातील अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी मुख्य कालव्याला झालेल्या हानीमुळे मुख्य कालव्याची प्रवाही क्षमता कमी झालेली असून सेतू प्रणालीमध्ये (एक्वीडक्ट) गळती

सुद्धा निदर्शनास आली. आर्थिक अडचणींमुळे बांधकाम व कालव्याच्या हानीची दुरूस्ती पा.वा.सं. ना शक्य नाही.

विभाग, वरील कामाचे अंदाज विशेष दुरूस्ती कार्य म्हणून तयार करीत असून सक्षम प्राधिकाऱ्याकडे मंजूरी करीता सादर करण्यात येईल. यामुळे मुख्य कालवा आराखडीत क्षमता पुन:स्थापित होईल व पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहचेल याची खात्री होण्यास मदत होईल.

शपथपत्रात प्रतिवादी क्र. ३ ने क्र. (ब) ते (ड) चे पूर्णपणे व (अ) आणि (ई) चे अंशत: अनुपालन केलेले आहे व पूर्णपणे अनुपालन करण्याकरीता आणखी कालमर्यादित पाउले उचलणे आवश्यक आहे.

वर दर्शविल्याप्रमाणे या आदेशाच्या परिणामक्षम कालावधीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत.

**अंतिम आदेश / दिशानिर्देश**

दाव्यातील पक्षकारांना ऐकून घेतल्यानंतर व अभिलेखावरील दस्तऐवजांना तसेच माहितीला (डाटा) व पक्षकारांकडून करण्यात आलेल्या सादरीकरणाला, प्रतिवादी क्र. ३ कडून सादर करण्यात आलेल्या त्याच्या दिनांक ११/०८/२०२० च्या पत्रासह जोडलेल्या शपथपत्राला योग्य प्रकारे विचारात घेउन, हया प्राधिकरणाला खालील प्रमाणे आणखी दिशानिर्देश देण्याचे योग्य वाटते.

१) याचिकाकर्ता गोविंदबाबा पाणी वापरकर्ता संघटना, निंबी, तहसिल मंगरुळपीर, जिल्हा वाशीम यांचे कडून या आदेशाचे तारखेपासून तीन महिन्याच्या आत शिल्लक पाणी शुल्क/उपकर वसूल करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

२) मोटसावंगा लघु सिंचन तलावाच्या मुख्य कालवा दुरूस्तीचे काम, लवकरात लवकर घेण्यात यावे जेणे करून कालव्याच्या शेवटपर्यंतच्या शेतकऱ्यांना पाण्याचा कायदेशीर कोटयाचे वितरणाची खात्री होईल.

३) आदेशाच्या अंमलबजावणीच्या पुनर्विलोकनाकरीता तसेच त्याच्या अंतिम अनुपालनार्थ दि. १५/१२/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता बोलावण्यात येत आहे.

४) यावेळी अस्तित्वात असलेल्या कोव्हिड–१९ महामारी–मार्गदर्शक तत्वांनुसार विचारात घेउन योग्य रीतीने त्यानुसार सुचीबद्ध करणे.

५) प्राधिकरणाचे सचिव यांनी सर्व संबंधितांना कळवावे व त्या प्रमाणे अनुपालन घेण्यात यावे.

स्वा/–
(विनोद कुमार जे. तिवारी)
सदस्य (विधि)

स्वा/–
(डॉ. एस. टी. सांगळे)
सदस्य (इकॉनॉमिक्स)

स्वा/–
(डॉ. रामनाथ सोनवने)
सचिव